# अपंगाच्या दीपस्तंभ - नसीमा हुरजूक

**प्रा.( डॉ.) लता पांडुरंग मोरे ,**
प्रमुख, मराठी विभाग
राजर्षी शाहू कला व वाणिज्य महा., रुकडी ,
ई-मेल - latapmore18@gmail.com

वयाच्या १४-१५ व्या वर्षापर्यंत सामान्य माणसासारखे जीवन जगणाऱ्या एखाद्या व्यक्तीला अचानक पाठीच्या दुखण्याचे निमित्त होऊन अंथरुणाला खिळावे लागते आणि पॅराप्लेजिक होऊन चाकाच्या खुर्चीवर उभे आयुष्य घालवावे लागते. या आघातामुळे सुरुवातीला ती व्यक्ती उन्मळून पडते पण नंतर स्वतःला सावरून , स्वावलंबी होऊन इतर अपंगांच्या पुनर्वसनासाठी उभे आयुष्य वेचते ती व्यक्ती म्हणजे नसीमा हुरजूक. त्यांच्या 'चाकाची खुर्ची' या आत्मचरित्राचा परिचय आज करून घ्यायचा आहे.

नसीमा हुरजूक यांचा जन्म २ सप्टेंबर १९५० रोजी झाला. त्यांचे वडील मोहम्मदअमीन हे केंद्रीय अबकारी खात्यात सुपरिटेंडेंट होते. त्यांच्या सतत बदल्या होत असत. त्यामुळे लेखिका तसेच त्यांच्या भावंडांचे शिक्षण जयसिंगपूर, नांदेड, कोल्हापूर अशा अनेक गावात झाले. वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत नसीमाताई यांचे जीवन इतर सामान्य मुलींप्रमाणे गेले. पण १६ व्या वर्षी त्यांना 'पॅराप्लेजिक' हा आजार झाल्यामुळे कमरेखालील शरीर संवेदनाहीन झाले. त्यामुळे संपूर्ण जीवन व्हीलचेअरवर घालवावे लागले. पण याही अवस्थेत त्यांनी हार मानली नाही.

नसीमाताईनी व्हीलचेअरवरुन हिंडता फिरता येऊ लागल्यानंतर दहावीची परीक्षा दिली. त्यानंतर गोखले महाविद्यालय, कोल्हापूर येथून अर्थशास्त्र विषयातील बी.ए.ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर बँकेच्या परीक्षा दिल्या आणि १९८४ पासून अबकारी खात्यात नोकरी करू लागल्या.

नसीमाताईना सख्खे व सावत्र मिळून सात बहिणी व दोन भाऊ असे त्यांचे कुटुंब मोठे होते. घरची परिस्थिती मध्यमवर्गीय होती. घरचे वातावरण मोकळे होते. दर रविवारी लेखिकेचे वडील व मुले स्वयंपाक करत आणि आईला सुट्टी देत. घरात प्रत्येकाला कामाची जबाबदारी वाटून दिली जात असे. नसीमाताईना पॅराप्लेजिकने अपंगत्व आल्यानंतर वर्षभरात त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि घरची परिस्थिती कठीण बनली. पण सर्वांनी मिळून याही परिस्थितीवर मात केली. घरच्यांच्या मदतीमुळे आणि सेवेमुळे नसीमाताईचे व्हीलचेअरवरचे जीवन समाधान व आनंदात जात आहे.

अपंगत्व येण्यापूर्वी नसीमाताईना खेळ व नृत्याची आवड होती. शालेय जीवनात त्यानी अनेक खेळात सहभाग घेतला होता आणि पारितोषिकेही प्राप्त केली होती. नृत्याची आवड असल्यामुळे त्यातही सहभाग घेतला होता. जयसिंगपूर येथील नृत्य स्पर्धेत त्यांच्या ग्रुपच्या नृत्यावेळी स्टेज कोसळले. नसीमाताई यांच्या पायाला दुखापत झाली. पण संयोजकांना विनंती करून दुखऱ्या पायाने नृत्य केले. या नृत्यात त्यांना प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. पण अपंगत्वानंतर त्यांना नृत्य या आवडीच्या क्षेत्रात भाग घेता आला नाही. पण त्यांनी व्हीलचेअरवर बसून अनेक खेळात भाग घेतला. अपंग क्रीडा स्पर्धेतून केवळ भारतातच नव्हे तर इंग्लंड पर्यंत गेल्या.

बेंगलोरमधील अपंग क्रीडा स्पर्धेत त्या चॅम्पियन ठरल्या. पॅराप्लेजिक असलेल्या बाबुकाका दिवाण यांच्या प्रेरणेमुळे लेखिकेने अपंग क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. बेंगलोरमधील स्पर्धक, त्यांची जिद्द यामुळे लेखिकेचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. इंग्लंडमधील स्पर्धेत त्यांना भारतीय मदतनीसकडून खूप वाईट वागणूक मिळाली. या क्षेत्रातील भ्रष्टाचार समजला. पण या स्पर्धेमुळे काही चांगल्या गोष्टी प्राप्त झाल्या. यामध्ये विजय मर्चंटसारख्या प्रेरणादायी व्यक्तीची ओळख झाली. त्यांच्यामुळेच 'ऑल इंडिया पॅराप्लेजिक स्पोर्ट्स संस्था' रजिस्टर झाली. त्यांच्या मॅनेजमेंटमध्ये लेखिकेने सहभाग घेतला. या माध्यमातून अनेक अपंग स्पर्धक खेळले.

पॅराप्लेजिक व्यक्तीचे आयुष्य म्हणजे मरण येत नाही म्हणून खितपत जगणे असते. पण नसीमाताईंच्या बाबतीत थोडे वेगळे घडले. त्यांना घरच्यांची प्रेमळ साथ मिळाली. बाबुकाका दिवाण, विजय मर्चंट, मनोहर देशभ्रतार, पी. डी. देशपांडे, अनिल अवचट यांच्यासारखे प्रेरणादायी गुरू मिळाले. त्यामुळे व्हीलचेअरवर असून देखील नसीमाताईंचे जीवन कोणाही सुदृढ व्यक्तीला लाजवेल इतके प्रेरणादायी झाले. त्यांचा जीवन विषयक दृष्टीकोण अनिल अवचट म्हणतात त्याप्रमाणे, “ रडायचं नाही खचायचं नाही” ( पृष्ठ ६) असा आहे.

नसीमाताईनी पॅराप्लेजिकसारख्या दुर्धर आजाराला सोबत घेऊन खूप मोठे अपंग पुनर्वसनाचे कार्य केले. अनेक अपंगांचे संसार फुलवले, अनेक अपंगांना जगण्याचे बळ दिले, रोजगाराबरोबरच स्वाभिमान आणि आत्मविश्वास दिला. यातीलच एक अविनाश दहाट दोन्ही हात नसलेला अपंग मुलगा. नसीमाताईंच्या अनेक गोष्टी तो तत्परतेने पूर्ण करत असे. अविनाश त्याच्या कर्तबगारीमुळे जागतिक अपंग दिना रोजी पाहुण्यांसोबत पायाने दीपप्रज्वलन करतो. अविनाश दहाटला पायाने दीपप्रज्वलन करताना पाहिल्यानंतर नसीमाताईंना आत्मचरित्र लेखनाची प्रेरणा मिळाली. याविषयी त्या म्हणतात, “ हा अविनाश दोन्ही हात नसून सर्व करू शकतो. परवा जागतिक अपंग दिनी हट्टानं पायात मेणबत्ती धरून त्याने पाहुण्यांसोबत दीपप्रज्वलन केलं. तर मग मी माझे अनुभव समाजापर्यंत इतर अपंगापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न का करू नये. मी सर्वांच्या आग्रहानं लिहीत आहे.” (पृष्ठ १)

नसीमाताईंचे गुरू बाबुकाका दिवाण, ते स्वतः पॅराप्लेजिक असूनही त्यांनी अत्यंत उत्साहाने अपंगांसाठी खूप मोठे कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे, प्रेरणेमुळे नसीमाताईंनी अपंग पुनर्वसन क्षेत्रात पाऊल टाकले. नसीमाताईंना बाबूकाकांनी शिक्षण पूर्ण करावे, खेळाच्या स्पर्धेत भाग घ्यावा, स्वतः स्वावलंबी बनून कोल्हापूरमधील इतर अपंगांसाठी कार्य करावे अशा कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी पटवून दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे नसीमाताईंनी आपण चाकाच्या खुर्चीत आहोत याचे विस्मरण झाले. नसीमाताई बाबूकाकांच्या व्यक्तिमत्वाबद्दल सांगतात, “ खूदी को कर बुलंद इतना मधील ‘बुलंद माणूस’ मला भेटला.” ( पृष्ठ ३३)

नसीमाताई म्हणतात अपंगांच्या अनेक समस्या आहेत. मुख्य म्हणजे त्यांना जगण्याचे योग्य ट्रेनिंग मिळत नाही. त्यामुळे त्यांचे जीवन अंधारमय होते, त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो. त्यामुळे अनेकजण व्यसनांच्या आहारी जातात. हे बदलायलले पाहिजे. अपंगांच्या उज्वल भविष्यासंबंधी नसीमाताई म्हणतात, “बाबूकाकांनी सर्व अडचणीवर मात करून कसं जगावं हे जसं मला शिकवलं तसं ज्या हॉस्पिटलमधून डिस्चार्ज घेऊन पेशंटस बाहेर पडतात तिथे का शिकवल जात नाही?” (पृष्ठ३७) अपंगांच्या उद्धारासाठी नसीमाताईनी ‘हेल्पर्स ऑफ दी हॅण्डिकॅप्ड’ ही संस्था १९८४ मध्ये कोल्हापूर येथे स्थापन केली. १९९३ मध्ये याच ठिकाणी ‘व्यवसाय प्रशिक्षण केंद्रा’ची स्थापना केली. अपंगांना रोजगार मिळवून देण्यासाठी तसेच कौशल्य शिकविण्यासाठी लेखिकेने स्वतः ऑफिस फाईल तयार करणे, कार्डबोर्डचे बॉक्स करणे, खडू बनवणे, पीओपीच्या मूर्ती बनवणे अशा अनेक कोर्सचे लघुउद्योग केंद्रातून स्वतः प्रशिक्षण घेतले व नंतर अपंगांना प्रशिक्षित केले. हे त्यांचे कार्य शरीराने धडधाकट असणाऱ्याला लाजवेल असे आहे.

अपंग लोकांना समाजात चांगली वागणूक दिली जात नाही. त्यामुळे नैराश्येपोटी ते व्यसनाधीन होतात. अपंगांमधील अशी व्यसनाधीनता प्रबोधनाद्वारे कमी केली, काही अपंग तर व्यसनांपासून शंभर टक्के दूर गेले.

**‘हेल्पर्स ऑफ दी हॅण्डिकॅप्ड’ संस्थेची स्थापना :-**

अपंगांच्या शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, आर्थिक, वैवाहिक असे सर्वांगीण पुनर्वसन करणे या हेतूने नसीमाताईनी 'हेल्पर्स ऑफ दी हॅण्डिकॅप्ड ' या संस्थेची स्थापना केली. अपंगांनाआवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, चांगली वागणूक मिळण्यासाठी जनजागृती करणे याबरोबरच अपंगांना सर्व दृष्टीने स्वावलंबी, सक्षम बनवणे हे या संस्थेचे उद्दिष्ट होते.

‘हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्ड’ या संस्थेद्वारे आतापर्यंत २५ हजार अपंग लाभार्थ्यांना सहाय्य केले. गेल्या २५ वर्षांत सहा कोटी रुपयांचे सेवा सहाय्य अपंगांसाठी पुरविले. निरंतर सेवा मिळावी या दृष्टीने वस्तीगृह,शाळा, पुनर्वसन व प्रशिक्षण केंद्र अशा सात कोटी रुपये किमतीच्या पायाभूत सुविधांची निर्मिती केली.

अपंग पुनर्वसनासाठी संपूर्ण आयुष्य खर्च केलेल्या नसीमाताईंची समाजाकडून एकच इच्छा होती की अपंगांना

समान वागणूक मिळावी. आपल्या वस्तीगृहामध्ये त्यांनी माणुसकी हाच धर्म पाळला.

नसीमाताईंनी अपंगांचे मनोबल वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. यासाठी विविध ठिकाणी सहलींचे आयोजन केले, मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले, शिबीरांचे आयोजन केले. त्यामुळेअपंगांना दैनंदिन जीवनातील रहाटगाडग्यातून बाहेर पडून सर्वसामान्य माणसांसारखे जीवन जगत असल्याचा अनुभव येत असे. परिणामी त्यांचे नैराश्य दूर होऊन आत्मविश्वास जागृत होत असे. एका सहलीमधून आत्मविश्वास जागृत झालेला मुलगा सहलीतील प्रतिक्रिया देताना नसीमाताईंना म्हणतो, " दीदी ! आपल्याला हवं असलेलं गोड बोलून, वागून न मिळाल्यास वेळप्रसंगी भांडून, झगडून मिळवायला हवं, हा धडा आम्हाला काल मिळाला. तुमच्यासारख धैर्य आमच्यात नाही. पण आम्ही यापुढे प्रयत्न करू." ( पृष्ठ१०६) नसीमाताईंना हाच आत्मविश्वास अपंगांमध्ये जागृत करावयाचा होता आणि यात त्या यशस्वी झाल्या असे या मुलाच्या उद्गारातून दिसून येते.

शासकीय बालगृहात अपंग मुलांना १४ वर्षापर्यंत सांभाळले जाते. त्यानंतर घरी पाठवले जाते. त्यामुळे अपंग मुलांचे शिक्षण अपूर्ण राहते आणि त्यांच्या अधोगतीला सुरुवात होते. अपंगांची ही वास्तव परिस्थिती बदलण्यासाठी नसीमाताईंनी १९९६ मध्ये 'घरोंदा' या वस्तीगृहाची आणि पुनर्वसन केंद्राची स्थापना केली. सध्या या केंद्रात १०० अपंग मुलं शारीरिक व मानसिक पुनर्वसनाबरोबरच शिक्षण घेतात. या केंद्रात प्रशिक्षणाबरोबरच आरोग्य तपासणी, शस्त्रक्रियेची व्यवस्था केली आहे. या संस्थेत परदेशी बनावटीची चाकाची खुर्ची, तीन चाकी सायकल, वॉकर , कॅलिपर, कमोड या बरोबरच देशी बनावटीच्या चाकाच्या खुर्च्या अशा अनेक वस्तू बनविल्या जातात. या वस्तूंची गुणवत्ता अनेकांनी वाखानल्या. अपंग पुनर्वसनाच्या या कार्याबद्दल आशावाद व्यक्त करताना नसीमाताई म्हणतात , " यापुढे समाज आम्ही बनवलेल्या वस्तूंची गुणवत्ता पारखून ती खरेदी करू लागेल व आर्थिक स्वावलंबनाचं आमच स्वप्नही एक दिवस साकार होईल." ( पृष्ठ २१२)

नसीमाताई स्वतः आजन्म अविवाहित राहिल्या. त्या अपंग असल्या तरी स्वावलंबी होत्या. घर कामातील अनेक गोष्टीत त्या पारंगत होत्या. पण तरीही त्यांनी विवाह बंधनात न अडकता एकटे राहण्याचा निर्णय घेतला. त्यांचे गुरु बाबूकाका दिवाण यांनी लग्न करण्याचा सल्ला दिला पण त्यांनी तो मानला नाही. लग्न न करण्याचे कारण देताना त्या म्हणतात, " मला लग्न करावं असं वाटणं अशक्य होतं. स्वतःचच आयुष्य एक मोठं ओझं असताना हे ओझं कोणावर लादण्याची माझी इच्छा नव्हती." ( पृष्ठ ६५) नसीमाताईंचा जितका स्वतःवर ताबा होता तितका इतर अपंगांमध्ये असेलच असे सांगता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी अपंगांच्या पुनर्वसनासाठी विवाह मंडळाची स्थापना केली. या केंद्रात गरजू तरुण-तरुणींचे विवाह झाले आणि त्यांचे संसार हसते-खेळते झाले.

नसीमाताईंची इच्छा होती की अपंगांना वेगळी वागणूक नको. त्यांना इतर मुलांप्रमाणे शाळेत प्रवेश मिळावा, सहशिक्षण घेता यावे. पण समाजात ते विचार लवकर अमलात येतील अशी खात्री नव्हती. यामुळेच त्यांनी इ.स. २००० मध्ये अपंग आणि सुदृढ विद्यार्थ्यांना एकत्र शिक्षण घेता यावे यासाठी उचगाव (जि.कोल्हापूर) येथे समर्थ विद्या मंदिराची स्थापना केली.

इ.स. २००१ मध्ये कुडाळ (जिल्हा सिंधुदुर्ग) येथे काजू प्रक्रिया प्रकल्प व वस्तीगृह असलेल्या 'स्वप्ननगरी' या प्रकल्पाची स्थापना केली. या संस्थेद्वारे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या तसेच रोजगाराची आवश्यकता असणाऱ्या अपंगांसाठी शिक्षण व रोजगार उपलब्ध करून दिले.

नसीमाताईंच्या अपंग पुनर्वसन या कार्याचा गौरव राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील विविध पुरस्कारांद्वारे करण्यात आला. यामध्ये केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय तथा सबलीकरण मंत्रालयाकडून सन २००१ चा रोल मॉडेल पुरस्कार; इचलकरंजीच्या फाउंडेशनचा पुरस्कार; सावित्रीबाई फुले पुरस्कार; बाया कर्वे पुरस्कार; लोक परिवारातर्फे स्पीक आऊट पुरस्कार; नवी दिल्लीतील एनसीपीडीपी तर्फे हेलन केलर पुरस्कार; सह्याद्री वाहिनीच्या 'नवरत्न पुरस्कार माले'तील रत्नशारदा पुरस्कार; कोल्हापूरभूषण पुरस्कार अशा अनेक मानाच्या पुरस्कारांचा समावेश आहे. एकूणच नसीमा हुरजूक यांचे व्यक्तिमत्त्व असंख्य अपंगांसाठी दीपस्तंभासारखे दिशादर्शक आहे.

VOL- XI | ISSUE- V | MAY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

**संदर्भ :-**

१. भालेराव विमल (डॉ.), आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास, साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, १९८६.

२. हुरजूक नसीमा - चाकाची खुर्ची, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००१.

३.राजाध्यक्ष विजया, मराठी वाङ्मय कोश, खंड- ४, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

४.वडगबाळ श्रुती, स्त्रियांची आत्मचरित्रे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००५.